शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**तक्रार अर्ज क्रं.०२/२०२४**

| | |
|---|---|
| डॉ.मृणालीनी भानुदास विजया आहेर<br>रा.घर नं.४,मातोश्री पार्क, डी मार्ट मागे,<br>पुणे-बेंगलोर हाय वे, म्हसवे, सातारा ४१५००१ | तक्रारदार |
| **विरूध्द्** | |
| १. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड,<br>ता.वाई, जि.सातारा ४१५४१३<br><br>२. रयत शिक्षण संस्था,सातारा<br>कर्मवीर समाधी परिसर, पोवई नाका, सातारा | वि. प |

रयत शिक्षण संस्था, सातारा यांचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड, ता.वाई, जि.सातारा यांचेकडील सहा.प्राध्यापिका डॉ.मृणालीनी भानुदास विजया आहेर यांनी दि.१८/०३/२०२४ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

१.रयत शिक्षण संस्थेने दबावास बळी पडून माझी अयोग्य आणि बेकायदेशीर बदली केली. आर. एस.गर्जे (पी.आय) यांनी संस्थेवर व यशवंतराव चव्हाण महाविद्यालयावर पदाचा गैरवापर करत बेकायदेशीर दबाव टाकला व त्यामुळे संस्थेने माझी चुकीच्या पध्द्तीने बदली केली. २. दि.१०/०८/२०२३ रोजी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात डॉ.विनायकराव जाधव यांचे वैचारिक भाषण आयोजित केले होते. सदर भाषणाच्यावेळी काही समाजकंटकांनी व काही हुल्लडबाज विद्यार्थ्यांनी तेढ निर्माण केली. परंतू दोषींच्या विरोधात आर एस गर्जे यांनी कारवाई करण्याऐवजी माझी विभागीय चौकशी करण्याचे बेकादेशीर पत्र महाविद्यालयास आर एस गर्जे यांनी काढले. ३. मयूर गायकवाड हे अशा प्रकारची हुल्लडबाजी करणेत अग्रेसर होते. त्यांचेवर या आधिच परिक्षेत कॉपी करण्याचा आरोप आहे. याबाबत त्यांनी माफी देखील मागीतली आहे. याचा राग मनात धरून त्यांनी कार्यक्रमात दंगा केला पण महाविद्यालयाने त्यांचेवर कोणतीही कार्यवाही केली नाही.

तक्रारदार यांनी याबाबत अधिकची माहिती देवून आपली अयोग्य आणि बेकायदेशीर झालेली बदली रद्द करणेची मागणी केली आहे. तसेच मयूर राजेंद्र गायकवाड याच्यावर चौकशी समिती नेमूण

त्याचा अहवाल एक महिन्याच्या आत तक्रार निवारण समितीकडे देण्यात यावा इत्यादी मागणी केलेली आहे.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

१. रयत शिक्षण संस्थेच्या सर्व सेवकांच्या बदली संदर्भातील प्रक्रिया संस्था पातळीवर राबविली जाते. महाविद्यालय स्तरावर बदली संदर्भात कोणताही निर्णय घेतला जात नाही. प्रा.डॉ.सौ. आहेर मृणालीनी भानुदास यांची संस्थेने प्रशासकीय बदली केलेली आहे.

२. दि.१०/०८/२०२३ रोजी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात मा.प्रा.डॉ.विनायकराव जाधव यांचे वैचारिक व्याख्यान आयोजित केले होते. सदर व्याख्यानाच्या वेळी झालेल्या परिस्थिती संदर्भात मा.आर.एस.गर्जे (पी आय) यांनी महाविद्यालयाला पत्र दिले आहे.

३. मयुर गायकवाड हा माजी विद्यार्थी दि.१०/०८/२०२३ रोजीच्या कार्यक्रमाला नव्हते.

**संस्थेचा अभिप्राय :**

संस्थेने दि.१६/०५/२०२४ रोजी तक्रारीबाबत समितीकडे लेखी म्हणणे सादर केले आहे. त्यामध्ये दि.१० ऑगस्ट २०२३ रोजी सदर महाविद्यालयामध्ये इतिहास विभागाने ऑगस्ट क्रांतिदिनाच्या पार्श्वभूमीवर प्रा.विनायकराव जाधव यांचे व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानास डॉ.आहेर या श्रोत्या म्हणून सभेला हजर होत्या. या व्याख्यानास प्रमुख वक्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल झालेल्या एकेरी उल्लेख केला व श्री.हनुमान यांचे संदर्भात केलेली वक्तव्ये यातून महाविद्यालयातील विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालक यांच्या भावना तीव्र आहेत. महाविद्यालयातील प्रा.डॉ. मृणालीनी आहेर यांनी प्रा.डॉ.विनायकराव जाधव यांच्या वक्तव्याचे समर्थन केले व छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख केला आहे. याबद्दलही सर्वांच्या भावना तीव्र आहेत.

श्री.आर.एस.गर्जे, सहाय्यक पोलीस निरिक्षक, भुईंज पोलिस स्टेशन यांनीही याबाबत पत्र दिले आहे. या पत्रामध्ये त्यांनी प्रा.विनायकराव जाधव, प्रा.डॉ. मृणालीनी आहेर यांचेवर कारवाई करावी, असे नमूद केले आहे.

त्याचप्रमाणे जिल्हा संयोजक, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, वाई या संघटनेने प्रा.विनायकराव जाधव यांनी माफी मागावी व शिक्षिका डॉ. मृणालीनी आहेर यांचेवर कडक कारवाई करावी असे अर्जात नमूद केले आहे. या बाबी प्राचार्यांनी या कार्यालयाकडे कळविलेल्या आहेत.

उपप्राचार्य, प्रा. खिलारे व विभागप्रमुख प्रा.कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना वेळीस समजावून सांगून सांमजस्याने गैरसमज त्याच दिवशी दि.१०/०८/२०२३ दुर करण्याचा प्रयत्न करणे अपेक्षित होते परंतु तसे झाल्याचे दिसून येत नाही. याबाबत दुस-या दिवशी दि.११/०८/२०२३ काही संघटना व ग्रामस्थ यांनी महाविद्यालय परिसरात जमाव गोळा केला व पोलिसात तक्रार दिली.याबाबत परिस्थितीचा रागरंग पाहून प्राचार्य, उपप्राचार्य, विभागप्रमुख प्रा.कोकाटे यांनी नंतर दिलगिरी व्यक्त केली. परंतु त्याचवेळी प्रा.डॉ.मृणालीनी आहेर यांनी वक्त्याची बाजू घेण्याचा प्रयत्न केला व कारण नसताना सदर चर्चेत सहभागी झाल्याचे दिसून येते. त्यांनी "शिवाजी कोण होता" या पुस्तकाचा संदर्भ देण्याचा प्रयत्न केला वस्तूतः असा संदर्भ ऐनवेळी रागावलेल्या जमावासमोर देण्याची आवश्यकता नव्हती. तो संदर्भ देत असताना त्यांचेकडून अनावधानाने महाराजांचा एकेरी उल्लेख झाला असे विद्यार्थ्यांचे व ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सर्व महाविद्यालय, महाविद्यालयातील सेवक वर्ग व इतर प्राध्यापक, प्राचार्य उपप्राचार्य व पोलिस प्रशासन जमावाला शांतता राखण्यासाठी आवाहन करत होते त्याचवेळी प्रा.मृणालीनी आहेर या ऐतिहासिक लेखनाचे दाखले देण्याचे प्रयत्न करीत होत्या. त्यातून वादविवाद वाढत गेल्याचे दिसून येते. त्याचवेळी काही अंशी प्रा.मृणालीनी आहेर यांचे पती प्रा.अहिरे यांनीही चर्चेत गरज नसताना सहभाग घेतल्याचे दिसते. त्यातून तक्रारी वाढत गेल्या. वस्तुतः प्रा.मृणालीनी आहेर यांनी त्यांचे पतींना महाविद्यालयात बोलाविण्याची गरज नव्हती.

दि.०४/०९/२०२३ रोजीही प्रा.डॉ. मृणालीनी आहेर यांचे भूमीका आजही ताठर स्वरूपाची असल्याची भेटीअंती दिसते. या प्रकरणाला त्या स्वतः काही अनावश्यक गोष्टी जोडताना दिसत आहेत. उदा.महाविद्यालयातील शिस्तीचा अभाव, बिगडणारी तरूण पिढी या विषयावरती त्या बोलत राहतात. ज्याचा या प्रकरणाशी काहीही संबध नाही. ग्रामस्थ त्यांची बदली करण्यास सूचवत आहेत. प्रा.आहेर यांनी घेतलेली ताठर भूमिका महाविद्यालयाच्या हिताची नाही असा एक सदस्यीय चौकशी समितीचा अहवाल आहे.

वरील अहवाल पाहता प्रा.डॉ. मृणालीनी आहेर यांची ताठर भूमीका पाहता, सामाजिक व धार्मिक सलोखा राखण्यासाठी संस्थेने प्रा.डॉ.आहेर यांची बदली दि.२७/१०/२०२३ रोजी यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड येथून शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद येथे केलेली आहे.

समितीची निरिक्षणे :

प्रस्तूत प्रकरणी उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकून घेण्यात आला. तक्रारदारातर्फे त्या स्वतः व वि.प. तर्फे प्राचार्या डॉ. मंजूषा विलासराव बोबडे यांनी युक्तीवाद केला. उभयपक्षी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन समितीने केले. ही बाब प्रकर्षाने दिसून येते की, दि.१०/०८/२०२३ रोजी वि.प.क्रं.१ महाविद्यालयातील इतिहास विभागाने ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त प्रा.विनायकराव जाधव यांचे व्याख्यान आयोजित केले होते व त्या व्याख्यानास महाविद्यालयातील विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालक इत्यादी हजर होते. व्याख्यानादरम्यान प्रमुख वक्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल एकेरी उल्लेख केला होता ही बाब उभयपक्षी मान्य आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बददुल सर्व सामान्यांमध्ये अतिव आदर, प्रेम, अतिशय तीव्र भावना आहेत हे सर्वश्रूत आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल आणि श्री.हनूमान यांच्याबददूल केलेल्या काही वक्तव्यांमुळे क्षुब्ध झालेल्या काही उपस्थितांना भाषणा दरम्यान तक्रारदारांनी मध्यस्थी करायचा प्रयत्न केला आणि त्यांना प्रा.गोविंद पानसरे यांचे "शिवाजी कोण होता" हे पुस्तक वाचण्यास सांगितले. तथापि जमलेल्या क्षुब्ध जमावाने तक्रारदार देखील छत्रपती शिवाजी महाराजांविरूध्द् काही वक्तव्य करीत आहेत असा समज करून घेवून अधिकच दंगा करू लागले. त्या घटनेच्या दुस-या दिवशी म्हणजेच दि.११/०८/२०२३ रोजी काही ग्रामस्थ आणि संघटना यांनी महाविद्यालय परिसरात जमाव गोळा केला आणि दि.१०/०८/२०२३ रोजीच्या घटनेचा निषेध व्यक्त केला आणि त्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर पोलीस सदर महाविद्यालयात आले आणि त्यांनी शांतता प्रस्थापित करायचा प्रयत्न केला ही बाब देखील उभयपक्षी मान्य आहे. तक्रारदारांनी स्वतः दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये अ.क्र.४ ला भुईंज पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरिक्षक श्री.आर.एस.गर्जे यांनी प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड, ता.वाई, जि.सातारा यांना दि.११/०८/२०२३ रोजी दिलेल्या पत्राची प्रत तक्रारदारांनी जोडलेली आहे. सदर पत्रामध्ये पोलीसांनी असे नमूद केले आहे की, दि.११/०८/२०२३ रोजी ते महाविद्यालयात येवून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून कॉलेज व्यवस्थापन, संबधित नागरिक यांची मिटींग घेत असताना प्रस्तुत तक्रारदार यांनी मिटींगमध्ये आरडाओरडा करून शांतता आणि कायदा सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न केला आहे. एवढेच नव्हे तर तक्रारदारांनी स्वताःच तक्रार अर्जात नमूद केल्याप्रमाणे सहाय्यक पोलीस निरिक्षक श्री.आर.एस.गर्जे यांच्या दि.११/०८/२०२३ रोजीच्या पत्रामध्ये या घटनेतील वक्ते यांचे चुकीचे समर्थन करणा-या व स्वताः देखील चुकीचे वक्तव्ये करणा-या व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणा-या शिक्षिका मृणालीनी भानूदास आहेर "तक्रारदार" यांची आपले स्तरावर चौकशी होवून त्यांचेवर योग्य ती कारवाई करण्यात यावी आणि केले कारवाईचा अहवाल पोलिस ठाणेस करण्यात यावा, असे नमूद आहे.

वर नमूद परिच्छेदामध्ये आणि कागदपत्रांमध्ये दि.१०/०८/२०२३ आणि दि.११/०८/२०२३ रोजी महाविद्यालयात घडलेल्या घटनांचा तपशिल दिलेला असून त्यामध्ये तक्रारदाराचा सहभाग दिसून येतो या उभयपक्षी मान्य असलेल्या बाबी आहेत. भुईंज पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरिक्षक श्री.गर्जे यांनी जी काही कारवाई केलेली आहे त्याबद्दल तक्रारदारांनी अतिशय तीव्र शब्दात आक्षेप घेतलेले असून त्यांचे दि.११/०८/२०२३ रोजीचे तक्रारदारांविरूध्द् कारवाई करण्याचे पत्र बेकायदेशीर असल्याबदद्लचे कथन केलेले आहे. तथापि त्याबद्दल तक्रारदारांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्यासमोर क्रिमीनल रि.पी.स्टॅप नं. १०६३९/२०२४ दाखल करून त्या कारवाईला आव्हान दिलेले आहे आणि ती प्रलंबित आहे. त्यामुळे ही समिती त्या कारवाईबाबत कोणतेही मत प्रदर्शीत करू शकत नाही. या समितीला एकच मुद्या विचारात घेता येवू शकतो आणि तो म्हणजे तक्रारदाराची झालेली बदली बेकायदेशीर, अयोग्य किंवा मनमानी होती किंवा कसे? या पलिकडे या समितीला इतर कोणताही विचार करता येणार नाही.

ज्या वेळेला एखादा कर्मचारी, मग तो कोणीही असो एखादी नेमणूक स्विकारतो त्या वेळेला ती नेमणूक स्वीकारताना जर ते पद बदली योग्य असेल तर, त्याच्या नेमणूकीच्या काळात त्याची बदली केंव्हाही होवू शकेल, या गृहीतासह तो ती बदली स्विकारतो आणि कामाच्या स्वरूपामुळे किंवा कार्यालयाच्या कामाच्या सोयीकरीता त्याची बदली एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी करण्याचा अधिकार त्याच्या मालकाला असतो हे कायद्याचे ठाम सुत्र आहे.शिवाजी विद्यापीठ कायदा १९७४ अंतर्गत तयार केलेल्या नियमावली मध्ये बदली बद्दल स्पष्ट तरतूद आहे. ती तरतूद खालील प्रमाणे :- Satutes framed under section 42(1) of the Shivaji University act, 1974. (452) : The Management of the College/Recognised Institution shall have the righe to make transfers of their teaching and non-teaching staff. However, while making such transfer, the magement shall observe the following norms:

A) transfers when necessary should be made only the commencement of the Academic year. However, under special circumstances such as promotions, personal requests of the teachers/non-teaching employees and further if the Management feels that the exigencies of the situation demand, transfers will be made even the second term of the year, If the transfer is made in the middle of the term it should be eflfected only for the sake of administrative convenience and the interest of the students should be safeguarded.

B) T.A and D.A for joining the place of transfer, if admissible for Govt. grant, shall be given as per the Govt. rules. Otherwise it shall be paid as per the rules of the Management. The joining period should be according to the Govt. rules. This order of transfer should be communicated to the person to be transferred and to the College between which the transfer is to take place. (emphasis Supplied) ही बाब युक्तिवादा दरम्यान तक्रारदारांच्या निदर्शनास आणून दिल्या नंतर त्यांनी देखील मान्य केले. याचा अर्थ असा की, तक्रारदाराची झालेली बदली ही बेकायदेशीर नाही आणि ती कायद्याच्या चौकटीत राहून केलेली आहे ही बाब शाबीत होते.

मग प्रश्न होतो की, तक्रारदारांची बदली योग्य होती की अयोग्य होती की ती मनमानी होती ती का? या प्रश्नांची उत्तरे नकारार्थी द्यावी लागतील कारण तक्रारदारांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरून असे दिसून येते की, घडलेल्या घटनेबाबत वि.प.क्र.२ यांनी एकसदस्यीय समिती नेमूण स्वतंत्र चौकशी केली त्या चौकशीत त्या तक्रारदाराला देखील म्हणणे मांडणेची संधी देण्यात आली होती आणि त्या समितीच्या अहवालानंतर तक्रारदाराची बदली पाचवड वरून करण्याचा निर्णय घेण्यात आला. तक्रारदारांनी जी कागदपत्रे या प्रकरणी दाखल केलेली आहेत त्यावरून असे दिसते की तक्रारदाराची बदली दि.१७/१०/२०२३ च्या आदेशाने बळवंत महाविद्यालय विटा, जि.सांगली या संस्थेच्या महाविद्यालयात करण्यात आली. त्याच दिवशी त्यांना कार्यमुक्त करण्यात आले परंतू तो बदली आदेश दिनांक (अस्पष्ट) क्रं.१५९६८ ने रद्द करण्यात आला आणि दि.२६/१०/२०२३ क्रं.१५९६९ च्या आदेशाने त्यांची बदली शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद या महाविद्यालयात करण्यात आली. एका परीने तक्रारदारांनी बदली त्याच जिल्हयात करण्यात आली आहे.

घडलेल्या घटनेच्या या पार्श्वभूमीवर जर तक्रारदाराची बदली वातावरण निवळण्याकरीता वि.प. ने केली असेल तर ती अन्यायमुलक किंवा अयोग्य म्हणता येत नाही. येत्या काळात वातावरण निवळल्यानंतर वि.प. तक्रारदारांना त्या जागी परत आणू शकतील तो त्यांचा अधिकार आहे. पण आज दाखल केलेल्या कागदपत्रांवरून आणि उभयपक्षी मान्य असलेल्या बाबी आणि तथ्यांवरून तक्रारदाराची झालेली बदली ही अयोग्य किंवा अन्यायमुलक वाटत नाही. त्यामुळे तक्रारदाराची तक्रार खारीज करावी लागेल असे या समितीचे मत आहे. तक्रारदाराची दुसरी मागणी हया तक्रार निवारण समितीच्या कार्यक्षेत्राबाहेरची आहे. त्यामुळे ती मान्य करता येत नाही. करीता ही समिती खालील आदेश पारीत करीत आहे.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

आदेश

तक्रार खारीज करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविण्ेत यावे.

दिनांक : 5 JUN 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)